| MHKO050027192023 | **म.सं.कौ.हि. का. क्र. ६४/२०२३ मधील नि.२३ खालील आदेश** | **ज्योस्ना विनोद पाटील<br>वि.<br>विनोद नरसगोंडा पाटील** |
|---|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज वि.प. क्र.१ यांनी अर्जदार यांनी कौटुंबिक हिसाचारापासून महिलांचे संरक्षण, २००५ चे कलम २१ प्रमाणे त्यांचे लहान मुलांचा अंतरिम ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वि.प क्र.१ यांचे असे कथन आहे की, अर्जदार व वि.प यांचा विवाह दि.२३ डिसेंबर २०१३ इ. रोजी हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व रितीरिवाजाप्रमाणे आळते ता. हातकणंगले येथे झाला. सदर विवाह बंधनातुन त्यांना कु. विधी वय ९ वर्षे आणि कु. विरेन वय ६ वर्षे अशी दोन अपत्ये झालेली आहेत. त्यांचा अर्जदार यांच्याकडे आहे. अर्जदार हि सध्या मनेरे हायस्कुल अँड ज्युनिअर कॉलेज इचलकरंजी येथे शिक्षिका म्हणुन नोकरीस आहे. तसेच यातील अर्जदार व तिची आई सावकारकीचा व्यवसाय करते. त्यामुळे यातील अर्जदार व तिची आई व्याजाच्या पैशाच्या वसुलीकरिता वारंवार जास्त काळ बाहेर असतात. त्यामुळे यातील अर्जदार हिचे कु. विधी व कु. विरेन यांच्या शाररिक व मानसिक आरोग्याकडे वारंवार दुर्लक्ष होत आहे. तसेच यातील अर्जदार व तिची आई यांच्या वारंवार बाहेर असल्यामुळे लहान मुलांच्या पोटाचे हाल होत आहेत. त्यामुळे दोन्ही लहान मुलांचे अतोनात हाल होत आहे.

३. वि.प.क्र.१ यांचे पुढे असे कथन आहे की, वि.प.क्र.१ व वि.प यांचे घरातील लोकांना मुलांची खुप आठवण येते. तसेच लहान मुलांना आजी व आजोबांच्या प्रेमाची नितांत गरज आहे. वि.प.क्र.१ व वि.प. यांचे घरातील लोक दोन्ही मुलांचा सांभाळ व संस्कार करणेस सक्षम आहेत. अर्जदार या दोन्ही लहान मुलांना मारहाण करणे घरी कोंडुन घालणे तसेच दोन्ही मुलांना यातील अर्जदार या 'तुझे वडिल मयत

आहेत' अशी शिकवणी करतात व यातील वि.प. यांचेविरोधात मन कलुशित करत आहेत. तसेच यातील वि.प. क्र.१ यांस मुलांना भेटणेस अर्जदार नकार देत आहे. त्यामुळे वडिलांची लहान मुलांपासुन ताटातुट होत आहे. वि.प. क्र.१ हे मुलांना भेटायला गेलेस वि. प. याचेवर खोट्या केसेस दाखल करण्याची धमकी देत आहेत.

४. वि.प.क्र.१ यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार व तिची आई या दोघीही त्यांचा सावकारकीचा व्यवसाय असल्यामुळे नेहमी बाहेर जात असुन अर्जदार हि मनेरे हायस्कुल अँड ज्युनिअर कॉलेज इचलकरंजी येथे शिक्षिका या पदावर नोकरीस असलेने दोन्ही लहान मुलांकडे यातील अर्जदार हिचे पुर्णपणे दुर्लक्ष होत आहे. परंतु अर्जदार हिने लहान मुलांना वि. प. याचेपासुन नजरकैदेत ठेवलेले आहे. वि.प यांचे दोन्ही लहान मुले हि यातील अर्जदार हिचे दहशतीखाली वावरत असुन तेथे त्यांचा अतोनात छळ होत असुन लहान मुलाची सुटका होणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, वि.प.क्र.१ यांना त्यांची लहान मुले कु. विधी व कु. विरेन यांचा मुळ अर्जाचे निकालापावेतो अंतरिम ताबा देणेत यावा किंवा दोन्ही मुलांची भेट घडवुन देणेचा अर्जदार हिला आदेश व्हावा अशी मागणी केली आहे.

५. प्रस्तुत अर्जास अर्जदार यांनी नि.२६ प्रमाणे म्हणणे दाखल केले. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, वि.प.क्र.१ यांनी प्रस्तूत अर्जातील कथने वस्तुस्थिती लपवून खोटया आशयाचीनमूद केली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या मुलांचा जन्मापासून आजपर्यंत अत्यंत चांगल्याप्रकारे सांभाळ व पालनपोषण केले आहे. अर्जदार क्र.१ यांचे अर्जदार क्र. २ व ३ यांचेवर आई नात्याने नैसर्गिक प्रेम आहे. वि.प.क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ ते ३ यांना त्यांचे राहते घरातून हाकलून लावलेपासून आजपर्यंत कधीही अर्जदार क्र.२ व ३ यांची साधी चौकशी केलेली नाही व वडील नात्याने कोणतेही कर्तव्य आजपर्यत कधीही पार पाडलेले नाही. वि.प.क्र.१ यांना दारुचे व्यसन आहे. तसेच वि.प.क्र.१ यांचे परस्त्री बरोबर अनैतिक संबंध असल्याचे स्पष्ट झाले असून सदर वि.प.क्र. १ यांचेकडे मुलांचा ताबा दिलेस त्यांच्या मुलांच्या पुढील जडणघडणीवर त्याचा दुरगामी विपरीत परिणाम होणार आहे. अर्जदार क्र.१ या आई असून त्यांना आई

नात्याने त्यांचे कर्तव्य व जबाबदारी अत्यंत उत्कृष्ठपणे निभावली आहे व निभावत आहेत. अर्जदार क्र. २ व ३ यांना कधीही वि. प. यांनी आपली मुले म्हणून सांभाळ केला नाही व कधीही मुलांकरीता एक पै देखील खर्च केलेला नाही. तसेच मुलांचे वडील असलेचे कोणतेही कर्तव्य पार पाडले नाही.

६.        अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र.२ व ३ यांचा ताबा अर्जदार क्र.१ यांचेकडेच राहणे अर्जदार नं.२ व ३ यांचे हिताचे आहे. सदरचा ताबा अर्जदार क्र.१ यांचेकडे आई नात्याने राहणे नैसर्गिकरित्या योग्य व न्यायाचे आहे. याउलट वि.प.क्र. १ यांचेकडे मुलांचा ताबा दिलेस मुलांचे त्यामध्ये कसलेही हित तर होणार नाहीच, उलट मुलांचे बालमनावर त्याचा अत्यंत नकारात्मक परिणाम होवून मुलांचे मानसिक व शारिरीक स्वास्थ बिघडणार आहे. आईकडून हिरावून घेतलेस मुलांचे कोवळया बालमनावर त्याचा गंभीर आघात होवून मुलांचे उज्वल भविष्य धोक्यात येवून त्यांचे सर्वांगीण विकासावर त्याचा घातक परिणाम होणार आहे. केवळ पोटगी दयावी लागू नये याकरीताच सदर अर्जाची रचना केली आहे. यापुर्वी दिले म्हणण्यामध्ये वि. प. यांनी मुलांचा ताबा मागितलेला नाही. यावरुनच वि.प. यांचा गैरहेतू स्पष्ट होतो. सबब, अर्जदार यांनी वि.प.क्र. १ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७.        दोन्ही बाजूचा युक्तीतवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने महिला कौटुंबिक हिंसाचारा कायदा अन्वये दाखल केला आहे. अर्जदार नं.१ व वि.प.नं.१ हे पती पत्नी आहेत याबाबत उभयंतामध्ये वाद नाहीत. तसेच त्यांना कु. विधी वय ९ वर्षे आणि कु. विरेन वय ६ वर्षे ही अपत्ये आहेत याबाबतही वाद नाही. तसेच कु. विधी आणि कु. विरेन हे अर्जदाराकडे आहेत याबाबात वाद नाही. कौटुंबिक हिसाचारापासून महिलांचे संरक्षण, २००५ चे कलम २१ प्रमाणे एखादया पक्षकाराला मुलाला भेटण्याची परवागनी देण्याचा या न्यायालयाला अधिकार आहे परंतु कायमस्वरूपी ताबा देण्याचा अधिकार नाही. अर्जदार व वि.प. हे वेगवेगळे राहतात व अर्जदाराची मुले विधी आणि कु. विरेन हे अर्जदारासोबत

राहण्यास आहेत. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये प्रकरण चालण्यास बराच वेळ लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे वि.प.नं.१ ची अर्जदार नं.२ व ३ सोबत भेट होणे आवश्यक आहे. त्यामुळे वि.प. यांना अर्जदार नं.२ कु. विधी आणि अर्जदार नं.३ कु. विरेन यांना भेटण्याची परवानगी दिल्यास अर्जदारावर कोणताही अन्याय होणार नाही. म्हणून मी खालील आदेश पारीत करतो.

**आ दे श**

१. प्रस्तुतचा अर्ज अशंतः मंजूर करणेत येतो.

२. अर्जदार नं.१ यांनी अर्जदार नं.२ कु. विधी आणि अर्जदार नं.३ कु. विरेन यांना दर महिन्याच्या १५ तारखेला ताबा सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत वि.प.नं. १ यांना दयावा.

३. अर्जदार नं.२ कु. विधी आणि अर्जदार नं.३ कु. विरेन यांचा ताबा दर महिन्याच्या १५ तारखेला संरक्षण अधिकारी, इचलकरंजी यांच्या समक्ष सकाळी १०.०० वाजता दयावा तसेच सायंकाळी ५.०० वाजता ध्रुव याचा ताबा संरक्षण अधिकारी, इचलकरंजी यांच्यासमक्ष वि.प.नं.१ यांनी अर्जदार नं.१ यांना दयावा.

४. सदरचा आदेश पुढील आदेशापर्यंत ठेवण्यात येतो.

५. सदर आदेशाची एक प्रत संरक्षण अधिकारी, इचलकरंजी यांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2025.12.20 11:11:15 +0530

**दिनांक– १९/१२/२०२५**
**इचलकरंजी.**

**(डी. बी. साठे)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**